# प्रेस नोट

## पोलीस रायझिंग डे आणि नववर्षाचे औचित्य साधून परिमंडळ 02 मधील गहाळ मोबाईल झालेले एकुण 85 मोबाईल परत केलेबाबत .....

**आज दि. 02/01/2025 रोजी पोलीस रायझिंग डे आणि नववर्षाचे औचित्य साधून परिमंडळ 02 कार्यालय येथे परिमंडळ 02 हद्दीतील मधील गहाळ झालेले एकुण 85 मोबाईल हे तक्रारदार यांना परत करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.**

**परिमंडळ 02 अधिनस्थ झोनल सायबर लॅब तसेच पोलीस ठाणेंस कार्यरत सायबर गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम, सातत्य आणि चिकाटीने प्रयत्न करून गहाळ झालेल्या मोबाईल पैकी एकुण 85 मोबाईल फोन यांचा तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोध घेवून परत मिळवण्याची कामगिरी केलेली आहे.**

**सदरचे मोबाईल हे परिमंडळ 02 कार्यालयात आयोजित कार्यक्रमादरम्यान उपस्थित ज्येष्ठ नागरीक, नोकरदार तरूण, तरूणी, विद्‌यार्थी तक्रारदार यांना त्यांचे गहाळ झालेले मोबाईल शोधून परत करण्यात आले. सदर वेळी उपस्थित तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल शोधून परत केल्याबद्‌दल पोलीसांचे आभार व्यक्त करून पोलीसांच्या कामगिरीवर समाधान व्यक्त केले.**

**तसेच सन 2024 मध्ये सदर पथकांनी अथक प्रयत्नांनी एकुण 187 सायबर फसवणुकींचे गुन्हे उघड करून, सायबर फसवणुकीच्या गुन्हे उघडकीस आणण्याची टक्केवारी 51 टक्क्यांच्या पुढे नेलेली आहे. सदर उघड गुन्हयांमध्ये एकुण 206 आरोपींना अटक करण्याची उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.**

परिमंडळ 02 मधील सायबर गुन्हे प्रकटीकरण पथकांनी केलेली कामगिरी ही निश्चितच बृहन्मुंबई पोलीस दलाची जनमानसातील प्रतिमा उंचावणारी आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. डॉ. श्री. अभिनव देशमुख, अप्पर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. डॉ. श्री. मोहित कुमार गर्ग, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 02 यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. डिगे, स.पो.नि. पाटील, स.पो.नि. शिंदे, स.पो.नि. मकानदार, पो.उप.नि. ढोरकुले, पो.उप.नि. महाडीक, पो.उप.नि. आरडक, पो. उप.नि. पवार, पो.उप.नि. शिंदे, पो.उप.नि. खैरनार, पो.उप.नि. घोलप, पो.उप.नि. होले आणि सायबर प्रकटीकरण पथक यांनी पार पाडली आहे.